दै. पुण्यनगरी दि. २८/०९/२०२२

सिनेस्टाईल पाठलाग करून जनावरे चोरणाऱ्या टोळीचा टेम्पो पकडला!

गाय व टेम्पो चालक ताब्यात; मरखेल व देगलूर पोलिसांची संयुक्त कारवाई

देगलूर/प्रतिनिधी

तेलंगणातील मदनूर नाका तसेच देगलूर तालुक्यातील दोन ठिकाणची नाकाबंदी तोडून गोमातेसह पळ काढणाऱ्या जनावरे चोरणाऱ्या टोळीचा टेम्पो मरखेल पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून बळाचा वापर करीत पकडला. त्यातील एकाला ताब्यात घेण्यात आले असून त्याचे अन्य चार साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. ताब्यात घेतलेल्या इसमासह टेम्पो व गाईला मदनूर पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे. हा थरार सोमवारी मध्यरात्री घडला.

मदनूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसावर गाडी घालून पळण्याच्या प्रयत्नात असलेल्या टेम्पोच्या चाकावर मदनूर पोलिस ठाण्यातील अधिकारी शिवकुमार यांनी ६ ते ७ गोळ्या झाडल्या.परंतु जनावरे चोरणाऱ्या टोळीने चोरीची गाय घेऊन टेम्पोसह पळ काढला.हा टेम्पो २७ सप्टेंबर रोजी रात्री भरधाव वेगात देगलूर व मरखेल पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याची माहिती देगलूर व मरखेल पोलिसांना मिळाली.

यामुळे सतर्क झालेले देगलूर देगलूर व मदनूरचे पोलिस या टेम्पोचा पाठलाग करीत होते. टेम्पोतील काही जण पोलिसांवर दगडफेक करीत आहेत, अशी माहिती देगलूरचे पोलीस निरीक्षक सोहन माछरे यांनी दिली. त्यामुळे मरखेल पोलिसांनी नाकाबंदी लावली. परंतु टेम्पो चालकाने भरधाव वेगात टेम्पो आणून ही नाका बंदी उधळून लावली. हणेगाव येथे रात्री २ वाजता गस्तीवर असलेले पोलीस निरीक्षक गुट्टे यांना माहिती दिली असता गुट्टे यांनी सिनेस्टाईल पाठलाग करीत वाटेत ट्रक उभा केला.

मात्र पळ काढणाऱ्या टेम्पो चालकाने रस्त्यावर ट्रक आडवा लावल्याचे टेम्पो रिव्हर्स घेऊन वळवून माघारी गेला. परंतु मागून सुद्धा पोलीसांची गाडी पाठलाग करीत येत होती. टेम्पो चालकाने पोलिसांच्या गाडीला जोरात धडक देवून पळ **(पान २ वर..)**